सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येत असलेल्या अन्नधान्य व्यवहारातील तुटीची प्रतिपूर्ती करण्यासाठीअर्थसहाय्य सन २०१७-१८

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्र.विसउस/कार्या-४(अर्थ)/प्र.क्र.१५/२०१७-१८/एपीएल
जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स, ८ वा मजला
लो.टि.मार्ग,मुंबई-४०००01
दिनांक-२७ मार्च, २०१८.

वाचा-

१.कृषी व अन्न नागरी पुरवठा शासन निर्णय क्र.EST १५६३/१३३०-S-IV दिनांक ११ सप्टेंबर १९६१ व दिनांक २५/११/१९६४.

२.वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग परिपत्रक क्र.विसउस/कार्या-४(अर्थ)/२०१५-१६/तुट निधी/प्र.क्र.३८९/२७१७ दि.३०/९/२०१५.

३.अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२ दि.२४/७/२०१५, दि.०७/०८/२०१५ व १६/०९/२०१५.

४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र७५/अर्थ-३ दि.१८ एप्रिल २०१७ व दि.३० जुन २०१७.

५. अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय क्र.विसउस/कार्या-४(अर्थ)/प्र.क्र.१५/२०१७-१८/एपीएल दिनांक २९ नोव्हेंबर २०१७.

प्रस्तावना-

केंद्र शासनाने दि.५ जुलै २०१३ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ देशात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यानुसार राज्य शासनाने माहे फेब्रुवारी २०१४ पासून राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम-२०१३ लागू केला असून त्याची अंमलवजावणी करण्यात येत आहे. तथापी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम-२०१३ अंतर्गत समाविष्ट न होणा-या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील राज्यातील अमरावती व औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हे व वर्धा जिल्हा असे एकूण १४ जिल्हयामधील एपीएल (केशरी) शेतकरी लाभार्थ्यांना संदर्भ क्र.३ नुसार माहे ऑगस्ट २०१५ पासून लाभ देण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून अशा लाभार्थ्यांसाठी Economic Cost च्या दराने (गहू रू.२४०८६.७ प्रति मे.टन व तांदुळ रू.३२६४२.३ प्रति मे.टन) धान्य प्राप्त होत आहे.सदर अन्नधान्य रास्तभाव दुकानातून तांदुळ रू.३ प्रति किलो, गहु रू.२ प्रति किलो व भरडधान्य रू.१ प्रति किलो दराने उपलब्ध करून देण्यात येत असून अन्नधान्य व्यवहारातील खरेदी व वाहतुक ,हमाली व हाताळणूक यावरील अनुषंगिक खर्च असा एकूण खर्च व धान्य विक्रीतून प्राप्त होणारी रक्कम वजा जाता योजनेमध्ये येणारी तुट भरून काढण्यासाठी सन २०१७-१८ या वर्षात मागणी क्र.एम-२, मुख्यलेखाशिर्ष २४०८-अन्न साठवण व वखार साठवण, (०१)-अन्न, १०१-प्रापण व पुरवठा, (०३)(००) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०३)(१७) अन्नधान्य व्यवहारातील तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी

अर्थसहाय्य (२४०८०४११),३३-अर्थसहाय्य रक्कम रू.६७५,६९,२५,०००/- इतके अर्थसंकल्पिय अंदाज मंजूर झालेले आहेत.सदर रक्कमेपैकी संदर्भ क्र.५ नुसार जिल्हयांना माहे एप्रिल २०१७ ते ऑगस्ट २०१७ या कालावधीतील रक्कम रू.३२७,३७,४२,०००/-इतकी अर्थसहाय्य रक्कम वितरीत करण्यात आली आहे. आता पुढील माहे सप्टेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीकरीता प्रतिपूर्ती करावयाची अर्थसहाय्य रक्कम रू.३४८,३१,८३,०००/- मुफसल क्षेत्रासाठी (ग्रामिण) जिल्हा कोषागार कार्यालयातून आहरीत करून जिल्हाधिकारी यांच्या स्वीय प्रपंजी लेखा खाती जमा करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न होणा-या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील राज्यातील १४ जिल्हयामधील एपीएल (केशरी) शेतकरी लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून संदर्भ क्र.३ नुसार खुल्या दराने धान्य खरेदी करून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेप्रमाणे धान्य उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या स्वीय प्रपंजी लेख्यात आलेली तुट भरून काढणे आवश्यक आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात १४ जिल्हयामधील एपीएल (केशरी) शेतकरी योजनेतील अन्नधान्य व्यवहारातील खरेदी-विक्री मधील फरक, दुकानदाराचे मार्जिन, वाहतुक,हमाली व हाताळणुकीवरील अनुषंगिक खर्च यामुळे स्वीय प्रपंजी लेख्यात येणारी तुट रक्कम भरून काढण्यासाठी मंजूर तरतुद रक्कम रू.६७५,६९,२५,०००/- आहे. संदर्भ क्र.५ नुसार माहे एप्रिल २०१७ ते ऑगस्ट २०१७ कालावधीसाठी एकूण अर्थसहाय्य रक्कम रू.३२७,३७,४२,००० वितरीत करण्यात आलेली आहे. आता माहे सप्टेंबर २०१७ ते मार्च २०१८ करीता प्रतिपूर्ती करावयाची अर्थसहाय्य **रक्कम रू.३४८,३१,८३,०००/- (अक्षरी रूपये तीनशे अठठेचाळीस कोटी एकतीस लाख त्रेऐंशी हजार फक्त**) सोबतच्या विवरणपत्रानुसार (अनुक्रमांक-४ नुसार) मुफसल क्षेत्रासाठी (ग्रामिण) जिल्हाधिकारी (जिल्हा पुरवठा अधिकारी) यांनी जिल्हा कोषागार कार्यालयातून आहरीत करून जिल्हाधिकारी यांचे स्वीय प्रपंजी लेख्यात लेखाशिर्ष ४४०८ अन्न साठवण व वखार साठवण यावरील भांडवली खर्च ०१-अन्न, ९०० भांडवली लेख्यावरील जमा व वसुली (०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (००)(०४) मुफसल भांडवली लेख्यावरील जमा व वसुली (४४०८०१७५),७० वजा वुसली लेख्यात वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.६/कोषा प्र-५ दिनांक २७ सप्टेंबर,२०१६ नुसार **पुस्तकी समायोजनाद्वारे** जमा करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी (जिल्हा पुरवठा अधिकारी) यांनी अन्नधान्य व्यवहारातील तुटीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय येथून रक्कम आहरीत करून या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.एम-२, मुख्यलेखाशिर्ष २४०८-अन्न साठवण व वखार साठवण (०१)अन्न, १०१-प्रापण व पुरवठा,(०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण ,(०३)(०७)अन्नधान्य व्यवहारातील तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी अर्थसहाय्य (२४०८०४११)३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली आर्थिक वर्ष

२०१७-१८ च्या मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीमधून भागविण्यात यावा. सदर योजनेवरील अर्थसहाय्य रक्कम विनाअट स्वरूपाची आहे. तरी सदर देयक सादर करतेवेळी वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.मुंधिनि-१००७/प्र.क्र.२२/०७/विनिमय दिनांक १६ मे २००७ नुसार प्रमाणकाच्या दर्शनी भागावर **बिनशर्त** (Unconditional) असल्याबाबत शिक्का मारण्यात यावा.

३. प्रमाणित करण्यात येते कि, या प्रकरणी वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि. १८ एप्रिल २०१७ आणि शासन परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि. ३० जुन २०१७ मधील अटी व शर्तीची पुर्तता झाली आहे. याकरीता उपरोक्त शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास मिळालेल्या प्राधिकारानुसार व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ .३०२ व्यय-१० दि. २३ मार्च,२०१८ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८११३४०९२३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सोबत- १४ जिल्हयातील अपेक्षित तुट रक्कमेचे विवरणपत्र

Satyavan Kisanrao Ubale

Digitally signed by Satyavan Kisanrao Ubale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46312f6d99372bbfaa1abf8afd92601cfe82b77598529968ecb9b717b86ddc13, serialNumber=cfdaf958228a997f0edd8c32876eb1e49285efc7850109e7abb75654a9030a24, cn=Satyavan Kisanrao Ubale
Date: 2018.03.28 11:36:49 +05'30'

(स.कि.उबाळे)

वित्तीय सल्लागार व उपसचिव

प्रत-

१) सर्व जिल्हाधिकारी
२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
३) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
४) महालेखापाल-१/२(ले व अ)महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
५) अधिदान व लेखा कार्यालय,बांद्रा,मुंबई-५१
६) सर्व जिल्हा कोषगार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय
७) कार्यासन अधिकारी, (व्यय-१०) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
८) कार्यासन-३(रोख शाखा) विसउस कार्यालय
९) कार्यासन-३(देयक शाखा) विसउस कार्यालय
१०) कार्यासन-७(१),७(२) विसउस कार्यालय
११) कार्यासन -११,१२ विसउस कार्यालय
१२) कार्यासल-४(खर्चमेळ) विसउस कार्यालय व निवड नस्ती.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र.विसउस/कार्या-4(अर्थ)/प्र.क्र.15/2017-18/एपीएल दिनांक 27/03/2018 सोबतचे जिल्हानिहाय अपेक्षित तुट रक्कमेचे (अर्थसहाय्य) विवरणपत्र

अ.क्र.	जिल्हा	एप्रिल 2017 ते ऑगस्ट 17 कालावधीत वितरीत अर्थसहाय्य रक्कम	सप्टेंबर 2017 ते मार्च 2018 कालावधीतील वितरीत करावयाची अर्थसहाय्य रक्कम	एकूण अर्थसहाय्य रक्कम
1	2	3	4	5
1	औरंगाबाद	259707000	348624000	608331000
2	जालना	146892000	133439000	280331000
3	नांदेड	364493000	395720000	760213000
4	बीड	443453000	411489000	854942000
5	उस्मानाबाद	171679000	292072000	463751000
6	परभणी	204844000	205159000	410003000
7	लातूर	222541000	234583000	457124000
8	हिंगोली	122543000	129835000	252378000
9	अमरावती	334708000	377369000	712077000
10	वाशिम	141283000	145165000	286448000
11	अकोला	163833000	151326000	315159000
12	बुलढाणा	273809000	252227000	526036000
13	यवतमाळ	256351000	251996000	508347000
14	वर्धा	167606000	154179000	321785000
एकूण		**3273742000**	**3483183000**	**6756925000**

Satyavan Kisanrao Ubale

Digitally signed by Satyavan Kisanrao Ubale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46312f6d99372bbfaa1abf8afd92601cfe82b77598529968ecb9b717b86ddc13, serialNumber=cfdaf958228a997f0edd8c32876eb1e49285efc7850109e7abb75654a9030a24, cn=Satyavan Kisanrao Ubale
Date: 2018.03.28 11:36:59 +05'30'

(स.कि.उबाळे)

वित्तीय सल्लागार व उपसचिव